# MITHI RIVER DEVELOPMENT AND PROTECTION AUTHORITY (MRDPA)



# Compendium of Authority Meeting

# MITHI RIVER DEVELOPMENT & PROTECTION AUTHORITY

# SEPARATOR

Minutes of 6th Authority Meeting

MITHI RIVER DEVELOPMENT & PROTECTION AUTHORITY
मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण
MRDPA

क्र.मिनविसंप्रा/बैठक०६/इतिवृत्त/ ५५ /२०१०	९ ऑगस्ट, २०१०

प्रति,
श्रीमती उमा अडुसुमिल्ली,
प्रकल्प संचालक, एमआरडीपीए

विषय - मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण
दि. २५ मे, २०१० रोजी झालेल्या ६व्या बैठकीचे इतिवृत्त

मा. महोदया,

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची ६वी बैठक दि. २५ मे, २०१० रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व अध्यक्ष, मि.न.वि.सं.प्रा. यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षामध्ये संपन्न झाली. बैठकीस उपस्थितांची यादी व बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

आपली विश्वासू,
(स्वाक्षरी) ९/८/१०
( उमा अडुसुमिल्ली )
प्रकल्प संचालक

सोबत - वरीलप्रमाणे

C/o. Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai - 400 051.

## मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण

दि. २५ मे, २०१० रोजी दु.४.०० वा., समिती कक्ष, मंत्रालय येथे आयोजित करण्यात आलेल्या ६व्या बैठकीस उपस्थितांची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अशोक चव्हाण, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २. | श्रीमती श्रद्धा जाधव, मा. महापौर, मुंबई | सदस्य |
| ३. | श्री. सुरेश शेट्टी, मा. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री, अतिरिक्त क्रिडा युवक कल्याण, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ४. | श्री. मिलिंद अण्णा कांबळे, मा. आमदार महोदय | सदस्य |
| ५. | श्री. राहुल शेवाळे, मा. सभापती, स्थायी समिती, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ६. | श्री. जे. पी. डांगे, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ७. | श्री. रत्नाकर गायकवाड, महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. | सदस्य |
| ८. | श्री. टी. सी. बेंजामिन, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ९. | श्री. स्वाधीन क्षत्रिय, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| १०. | श्री. एम. के. श्रीवास्तव, सचिव (२), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ११. | श्रीमती वल्सा आर. नायर सिंग, सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| १२. | श्री. दिलीप शिंदे, उप सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य प्रतिनिधी |
| १३. | श्री. कपिल गुप्ता, आयआयटी, पवई, मुंबई | सदस्य प्रतिनिधी |
| १४. | श्री. राकेश कुमार, शास्त्रज्ञ आणि प्रमुख, निरी, विभागीय प्रयोगशाळा, मुंबई | सदस्य प्रतिनिधी |
| १५. | श्रीमती उमा अडुसुमिल्ली, प्रकल्प संचालक, एमआरडीपीए | सदस्य सचिव |
| १६. | श्रीमती अश्विनी भिडे, सह महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. | निमंत्रित |
| १७. | श्री. अजित सराफ, मुख्य, जल प्रदूषण व अबेटमेंट अभियंता, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई | निमंत्रित |
| १८. | श्री. चारुदत्त देशमुख, उपाध्यक्ष, मुंबई आंतरराष्ट्रीय विमान पत्तन प्रा.लि. | निमंत्रित |
| १९. | श्री. हेमंत दवे, उपाध्यक्ष, मुंबई आंतरराष्ट्रीय विमान पत्तन प्रा.लि. | निमंत्रित |
| २०. | श्री. रमेश भाटी, मुंबई आंतरराष्ट्रीय विमान पत्तन प्रा.लि. | निमंत्रित |
| २१. | श्री. इ. के. म्हात्रे, मुख्य अभियंता (एसडब्ल्यूडी), बृहन्मुंबई महानगरपालिका | निमंत्रित |
| २२. | श्री. एम. के. राइलकर, उप मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका | निमंत्रित |
| २३. | श्री. के. एच. मनियर, उप मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका | निमंत्रित |
| २४. | श्री. एस. आर. नंदर्गीकर, मुख्य अभियंता, मुं. म. प्र. वि. प्रा. | निमंत्रित |
| २५. | श्री. डी. यु. गजभिये, अधीक्षक अभियंता, मुं. म. प्र. वि. प्रा. | निमंत्रित |
| २६. | श्री. प्र. सं. कपिलेश्वर, प्रमुख, जलविज्ञान पथक, मुं. म. प्र. वि. प्रा. | निमंत्रित |
| २७. | श्री. संपत कुमार, वरिष्ठ नियोजन, नियोजन विभाग, मुं. म. प्र. वि. प्रा. | निमंत्रित |
| २८. | श्री. दिलीप कवठकर, सहप्रकल्प संचालक (जनसंपर्क), मुं. म. प्र. वि. प्रा. | निमंत्रित |

## मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण
## दि. २५ मे, २०१० रोजी झालेल्या ६व्या बैठकीचे इतिवृत्त

मीठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची ६ वी बैठक दि. २५ मे, २०१० रोजी मुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षामध्ये संपन्न झाली. उपस्थित सदस्यांना कार्यसूचीची प्रत, दि. २५ मे, २००८ रोजी संपन्न झालेल्या ५व्या बैठकीचे इतिवृत्त, त्याचा कार्यवाही अहवाल, मीठी नदी व वाकोला नाल्याचा नकाशा ज्यामध्ये वेगवेगळया चैनेजवरील नदी व नाल्याची रुंदी (सध्या बांधलेल्या व प्रस्तावित) तसेच संरक्षक भिंतीचे स्थान दाखविले व चर्चेसाठीचे विषयाबाबत माहिती देण्यात आली. सर्वप्रथम सदस्य सचिव व प्रकल्प संचालक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन ६व्या बैठकीतील विषयाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

<u>बाब क्र. १</u>

५व्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी देणे : ५व्या बैठकीची चर्चा होऊन मंजूरी देण्यात आली.

<u>बाब क्र. २</u>

५व्या बैठकीतील घेतलेल्या निर्णयाचा कार्यवृत्त अहवाल : सदस्य सचिव यांनी सादर केलेल्या ५व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांचा कार्यवृत्त अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

<u>बाब क्र.३ :</u>

<u>मीठी नदी कामांची भौतिक व आर्थिक प्रगती</u> : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई महानगरपालिका यांनी हाती घेतलेल्या मीठी नदीचे विकास कामांचे सद्यस्थितीबाबत माहिती देण्यात आली. मुं.म.प्र.वि.प्रा.ने त्यांचे कामे डिसेंबर, २०१० पर्यंत पूर्ण होतील असे सांगितले. तसेच मुंबई महानगरपालिकेने नदीवरील एकूण १० पूलांचे पुन्हा बांधकाम करावयाचे असल्याने त्यांच्या हद्दीतील कामे मार्च, २०१२ पर्यंत पूर्ण होतील असे सांगितले.

भौतिक प्रगती :

| अक्र. | कामाचे नाव | पथक | | मुंमप्रविप्रा | बृमपा | एकूण | कामगिरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | खोदकाम | लक्ष घ.मी. | लक्ष्य | ४०.५३ | १५.७२ | ५६.२५ | |
| | | | कामगिरी | ३५.०६ | १२.४२ | ४७.४८ | ८४% |
| २. | संरक्षक भिंती | कि.मी. | लक्ष्य | ११.०० | २०.०० | ३१.०० | |
| | | | कामगिरी | ०५.५० | ०७.५० | १३.०० | ४२% |
| ३. | सेवा रस्ता | कि.मी. | लक्ष्य | ०९.९० | १२.५० | २२.४० | |
| | | | कामगिरी | ००.५० | — | ००.५० | २% |
| ४. | सौंदर्यीकरण | कि.मी. | लक्ष्य | ०३.०८ | — | ०३.०८ | |
| | | | कामगिरी | ००.७० | — | ००.७० | २३% |

आर्थिक प्रगती (रु.कोटीत)

| संस्था | टप्पा-१ व २ ची एकूण रक्कम | टप्पा-१ (२००६ मध्ये पूर्ण) | टप्पा-२ ची एकूण अंदाजित रक्कम | टप्पा-२ चे मार्च, २०१० पर्यंतचे खर्च | निव्वळ खर्च |
|---|---|---|---|---|---|
| मुंमप्रविप्रा | ०४५०.०६ | ३२.५५ | ४१७.५१ | २१४.२० | २०३.३१ |
| बृमपा | १२७१.४० | ३१.८० | १२३९.६० | ३७३.०० | ८६६.६० |
| **एकूण** | १७२१.४६ | ६४.३५ | १६५७.११ | ५८७.२० | १०६९.९१ |

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कंपनीने सांगितले की आयआयटी, मंबई यांनी मुंबई विमानतळ क्षेत्रांतर्गत येणा-या मीठी नदीवरील पूल ४७ मीटरपर्यंत वाढविण्याबाबत सुचविले आहे. तसेच त्यासाठी आवश्यक संकल्प चित्राला जूनच्या पहिल्या आठवडयात आयआयटीची मान्यता मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली.

प्रकल्प संचालकांनी सांगितले की वरील कामे पूर्ण झाल्यानंतर मीठी नदी व वाकोला नाल्याच्या जलधारणाची क्षमता दुपटीने वाढणार आहे. प्रकल्प संचालकांनी पुढे सांगितले की मीठी नदीचे कामांसाठी BRIMSTOWAD च्या धर्तीवर केंद्र शासनाकडून एसीएच्या स्वरुपात निधी मिळण्याची शक्यता आहे. श्री. श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग व सदस्य, मि.न.वि.सं.प्रा. यांनी सांगितले की एकूण खर्चाचा ३०% म्हणजे सुमारे ७०० कोटी देणेबाबत केंद्र शासन स्तरावर विचार विनिमय चालू आहे. मा. अध्यक्ष महोदयांनी सद्यस्थितीचा आढावा घेतल्यानंतर संबंधित संस्थेने लवकरात लवकर काम पूर्ण करणेबाबत निर्देश दिले.

<u>**बाब क्र.४ :**</u>

मिठी नदी व वाकोला नाल्याची रुंदी वाढविणे : ५ व्या बैठकीत ठरविल्याप्रमाणे मुंबई महानगर विकास प्राधिकरण व मुंबई महानगरपालिका यांनी मिठी नदीची व्यवहार्य रुंदी ठरविण्याबाबत संबंधित विधान सभा सदस्यांबरोबर चर्चा केली. त्याप्रमाणे मिठी नदीची प्रस्तावित रुंदी दर्शविणा-या नकाशाची प्रत सर्व सदस्यांना देण्यात आल्या व सादरीकरणाद्वारे दाखविण्यात आल्या व तसेच खालील बाबी निदर्शनास आणून दिल्या.

- मिठी नदी व वाकोला नाल्यात भरती-ओहोटी अंतर्गत व बाहेरील भाग समाविष्ट आहे.
- सीडब्ल्यूपीआरएसने भरती-ओहोटी अंतर्गत येणा-या व बाहेरील येणा-या दोन्ही क्षेत्रांसाठी १०० वर्ष return period साठी रुंदी वाढविण्याबाबत शिफारस केली आहे. तसेच प्रत्येक भागास वेगवेगळी रुंदी सुचविण्यात आली आहे.
- महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या सत्य शोधन समिती (FFC) ने भरती-ओहोटी क्षेत्रामध्ये येणा-या भागासाठी असे १०० वर्षे कालावधीसाठी रुंदी वाढण्याची शिफारस केली आहे. तसेच भरती-ओहोटी बाहेरील क्षेत्रासाठी १० वर्ष return period विचारात घेण्याचे सुचविले आहेत. मुंमप्रविप्राच्या विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) क्षेत्रांतर्गत येणारा मीठी नदी व वाकोला

नाल्याचा भाग भरती-ओहोटी खालील असल्याने सीडब्ल्यूपीआरएस यांनी सुचविलेल्या शिफारसी लागू होतात व भरती-ओहोटी बाहेरील क्षेत्रासाठी मुंबई महानगरपालिकेने सत्य शोधक समितीने सुचविल्याप्रमाणे रुंदी निश्चित करुन मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणास सादर केला आहे.

बृ.म.पा. आयुक्त यांनी सांगितले की मिठी नदी व वाकोला नाल्याची रुंदी स.शो.समितीने सुचविल्याप्रमाणे म.न.पा.ने निश्चित केली आहे.

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कंपनीने त्यांच्या क्षेत्रातील नदीवरील पूलाचे रुंदी ४७ मी. ठेवली असून सदर काम येत्या पावसाळयानंतर सुरु करुन पुढील २ वर्षात पूर्ण करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यास विनंती केली.

मुंमप्रविप्रा व मुंबई महानगरपालिकेने सुचविल्यानुसार मिठी नदीच्या सीएसटी पूलाजवळ वांद्रे-कुर्ला संकुलात येणा-या क्षेत्रासाठी ६० मी. व उत्तरेकडील मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रुंदी १०० मी. ठेवण्याबाबत चर्चा झाली. तसेच काही सदस्यांनी नदीची रुंदी सीएसटी पूलापासून नवीन मिठी पूलापर्यंत ६० मी. ठेवण्याबाबतही चर्चा केली. चर्चेनंतर सीएसटी पूलाजवळील फक्त १०० मी.लांबीच्या क्षेत्रासाठी ६० मी. रुंदी व उर्वरीत क्षेत्रासाठी प्राधिकरणाने सुचविल्याप्रमाणे वाढवत १०० मी.पर्यंत रुंदी ठेवणे योग्य होईल असे ठरविले.

प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की सध्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सुचविल्याप्रमाणे जागेवर काम करतांना येत असलेल्या अडचणींचा विचार करुन तात्पुरत्या स्वरुपात कमी रुंदी निश्चित करावे व नंतरच्या काळामध्ये जर अडचणी दूर झाल्या तर सीडब्ल्यूपीआरएसने सुचविल्याप्रमाणे रुंदी वाढविणे योग्य होईल.

श्री. राकेश कुमार, नीरी यांनी असे सुचविले की वरीलप्रमाणे सुधारित नदी channelisation चा प्रस्ताव सीडब्ल्यूपीआरएसला सादर करुन सुधारित return period तपासून घ्यावा.

**निर्णय**

मिठी नदी व वाकोला नाल्याची रुंदी शासन नियुक्त सत्यशोधन समितीने सुचविल्याप्रमाणे निश्चित करणे परंतु खालील नमूद भागामध्ये मुंमप्रविप्राने उल्लेख केलेल्या अडचणी विचारात घेऊन नदीची रुंदी कमी करण्याचे मान्य केले.

१. सीएसटी पूल ते नवीन मिठी पूलापर्यंत (बीकेसी) ६० ते १०० मी. असावा व तसेच सीएसटी पूलापासून वांद्रे-कुर्ला संकुलात १०० मी. लांबीपर्यंत कमीत कमी रुंदी ६० मी. असावा.
२. नवीन मिठी पूल ते लहान संगमपर्यंत १०० मी. ते २०० मी. असावा परंतू सरासरी रुंदी १६० मी. असावी.

वरील निर्णयाच्या अधीन राहून मुंमप्रवि प्राधिकरणाने आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित केलेले आणि यासंबंधी सादर केलेल्या नकाशामध्ये दर्शविलेले मिठी नदी आणि वाकोला नाला यांचे प्रस्तावित रेखांकन आणि रुंदी यांना मान्यता दिली.

**बाब क्र.५ :**

स्लुईज गेट बसविणे : प्रकल्प संचालक यांनी सांगितले की प्राधिकरणाच्या ५व्या बैठकीत मिठी नदीवर माहिम कॉजवे येथे स्लुईज गेट बसविण्याच्या विषयावर चर्चा झाली होती व याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शक्ति प्रदत्त समितीने निर्णय घेण्याबाबत ठरविण्यात आले होते. याबाबत मा. अध्यक्षांनी बैठकीत उपस्थित तांत्रिक सल्लागारांना त्यांचे अभिप्राय विचारले. श्री. राकेश कुमार, निरी यांनी सांगितले की जास्त पाऊस पडल्यास असा स्लुईज गेटचा फायदा होणार नाही. तसेच श्री. कपिलेश्वर (माजी प्रमुख शास्त्रज्ञ, सीडब्ल्यूपीआरएस) व प्रमुख हायड्रॉलॉजी सेल, मुंमप्रविप्रा व डॉ. कपिल गुप्ता, प्राध्यापक, आयआयटी यांनीही स्लुईज गेटचा फायदा होणार नाही असे सांगितले. तसेच सदस्यांच्या निदर्शनास आणले गेले की, या विषयावर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली मुंमप्रविप्रा कार्यालयात झालेली दि. ३ जानेवारी, २०१० रोजीच्या बैठकीत स्लुईज गेट बांधू नये असे ठरविले. चर्चेअंती मुख्य सचिवांनीही स्लुईज गेट बांधकाम करु नये असे सांगितले.

**निर्णय**

या विषयावर चर्चा होऊन प्राधिकरणाने माहिम कॉजवे येथे स्लुईज गेट बांधू नये असे ठरविले.

**बाब क्र. ६ :**

संरक्षक भिंत बांधणे : प्रकल्प संचालकांनी असे सांगितले की मुंबई महानगरपालिका मिठी नदीलगत एकूण २० कि. मी. लांबीची संरक्षक भिंत बांधण्याचे काम होती घेतले असून त्यापैकी ७.५ कि.मी. लांबीचे बांधकाम पूर्ण केले आहे. तसेच मुंमप्रविप्राने प्रस्तावित ११ कि.मी. पैकी ५.५ कि.मी. संरक्षक भिंतीचे काम पूर्ण केले आहे. काम पूर्ण झालेल्या व प्रस्तावित संरक्षक भिंतीचे स्थान दर्शविणारा नकाशा उपस्थित सदस्यांना दाखविण्यात आला. आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांनी इतक्या लांबीची संरक्षक भिंत बांधण्याबद्दलचा मुद्दा चर्चेसाठी उपस्थित केला. काही सदस्यांनी सदर भिंतीमुळे नदीचे किनारे संरक्षित होतात, त्यामुळे अनधीकृत बांधकामांना आळा बसेल व नदी पात्रात गाळाचे प्रमाण कमी होणार आहे असे सांगितले. डॉ. राकेश कुमार, निरी यांनी तिवरालगत संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे योग्य होईल का असा मुद्दा उपस्थित केला. चर्चेनंतर मा. अध्यक्षांनी निर्देश दिले की तिवरांच्या झाडाजवळ संरक्षक भिंतीचे संकल्पचित्र तज्ञांच्या सल्ल्याने तयार करण्यात यावे.

**निर्णय**

या विषयावर चर्चा होऊन प्राधिकरणाने असा निर्णय घेतला की मुंबई महानगरपालिकेने नकाशात प्रस्तावित केल्याप्रमाणे, काही तांत्रिक अडचणींची ठिकाणे वगळून, संरक्षक भिंत बांधावी.

**बाब क्र. ७ :**

नदीला लागून सेवा रस्ता : प्रकल्प संचालकांनी मिठी नदी व वाकोला नाल्याचे दोन्ही बाजूस नवीन बांधकाम व पुनर्विकास क्षेत्रातून ६ ते १२ मी.चा सेवा रस्ता बांधण्याचे प्रस्तावित असल्याचे सांगितले. प्रकल्प संचालकांनी पुढे सांगितले की ज्या ठिकाणी विकसित क्षेत्रातील अंतर्गत रस्ता नदी किनाऱ्यास समांतर असेल किंवा जवळ असेल तर सदर रस्ता सेवा रस्ता म्हणून वापरण्याविषयी

जमीन मालकांना कळविण्यात येईल व आवश्यक असेल तेव्हा नदीस पोहोचण्यासाठी संबंधित संस्थांना हक्क राहील असे कळविण्यात येईल. ज्या ठिकाणी नदी किना-यावर सेवा रस्ता बांधणे शक्य नाही व अस्तित्वातील रस्ता नदी किना-यालगत असेल आवश्यक तिथे सेवा रस्त्याऐवजी योग्य अंतरावर नदीपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता (point access) बांधण्यात येईल.

**निर्णय**

प्राधिकरणाने वरील प्रस्तावास मान्यता दिली व सेवा रस्त्यांचे मिठी नदी व वाकोला नाल्याचे अंतिम संरेखन व रुंदी तसेच सेवा रस्त्यांचे संरेखन व रुंदी मुंबईचा विकास आराखडा सुधारित करतांना त्यामध्ये समाविष्ट करण्याचे निर्देश दिले.

**बाब क्र. ८**

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अंतर्गत धावपट्टी खालील मिठी नदीवरील पुलाच्या रुंदी : या बाबत चर्चा करण्यात आली. डॉ. कपील गुप्हा, आयआयटी यांनी सांगितले की त्यांनी स्वतः या विषयावर आयआयटीच्या वतीने अभ्यास केला असून पूलाची रुंदी ४७ मी. इतकी आवश्यक आहे. पुढे असे सांगितले की धावपट्टीच्या खालच्या बाजूस नदीची रुंदी १०० मी. व वरच्या बाजूस सुमारे ३०-३५ मी. इतकी आहे. विमानतळ कंपनीच्या प्रतिनिधीने सांगितले की पूलाचा बांधकामाचा खर्च सुमारे रु. १५० कोटी होणार आहे आणि पूलाचे बांधकाम करतांना होणा-या कमी लांबीच्या धावपट्टीमुळे कंपनीच्या उत्पन्नामध्ये तोटा होणार आहे, त्यामुळे महाराष्ट्र शासनाने पूलाच्या रुंदीकरणाचा खर्च देण्याची विनंती केली.

**निर्णय**

वरील विषयी चर्चा होऊन धावपट्टी खालील पूलाच्या रुंदीबाबत आयआयटीने सादर केलेला अहवाल मान्य करुन पूलाची रुंदी ४७ मी. इतकी ठेवणे व नदीच्या पात्रात बदल न करण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला. तसेच पूलाचे बांधकाम त्वरेने करण्यास आणि प्रस्तावित पूलाचा बांधकामाचा खर्च सुमारे रु. १५० कोटी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कंपनी स्वतःच्या निधीतून करण्यास मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कंपनीला निर्देश दिले. महाराष्ट्र शासनाने पूलाच्या रुंदीकरणाचा खर्च देण्याची विमानतळ कंपनीच्या विनंतीवर मा. अध्यक्षांनी याबाबत स्वतंत्ररीत्या महाराष्ट्र शासनाला संपर्क करण्यास सांगितले.

त्यानंतर मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

मुख्यमंत्री व
अध्यक्ष, मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण




# MITHI RIVER DEVELOPMENT & PROTECTION AUTHORITY

*PROPOSED MITHI RIVER AND VAKOLA NALA WIDENING*

दि.२५ मे,२०१० रोजी दु.०४.०० वा. समिती कक्ष,मंत्रालय येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस उपस्थित असलेल्यांची यादी

बैठकीचा विषय :- मिठी नदी विकास प्राधिकरण सहावी बैठक

| अ.क्र. | नांव | पदनाम | स्वाक्षरी | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | सौ. श्रद्धा श्रीधर जाधव | महापौर | श्रद्धा जाधव | 9820702855 |
| २ | प्रा० राहुल र. शेवाळे | अध्यक्ष - स्थायी समिती | [signature] शेवाळे | 9930605511 |
| ३ | मिलिंद आण्णा कांबळे | कुर्ला ५०४ वार्ड (आमदार) | [signature] | 9870828444 |
| ४ | डा० राकेश कुमार | निदेशक नीरी | [signature] | 9820339821 |
| ५ | चारुदत्त देशमुख | VICE PRESIDENT MIAL | Charudutta | 9833301594 |
| ६ | हेमंत दवे | VICE PRESIDENT MIAL | Himant Dave | 98190654-00 |
| ७ | वत्सला नायर सिंह | पर्यावरण सचिव | [signature] | 9920800457. |
| ८ | अजित सराफ | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | [signature] | 9869440159. |
| ९ | दिलीप शिंदे | उपसचिव (गृहनिर्माण) | दिलीप | 9422209777 |
| १० | KAPIL GUPTA | Professor, CIVIL ENGG IIT BOMBAY | [signature] | 9820409433 |
| ११ | Ashwini Bhide | Jt MC MMRDA | [signature] | 9892729992 |
| १२ | मनु कुमार श्रीवास्तव | सचिव (नवि-2) | [signature] | 9820719800 |
| १३ | टी. सी. बेंजामिन | प्र. स (नवि-1) | [signature] | 9870333003 |
| १४ | जे. पी. डांगे | मु. स. | [signature] | — |
| १५ | K. H. Maniar | Dy Ch. E (Br. [illegible]) | [signature] | 9869466999 |
| १६ | E.K. Mhatre | Ch. Eng. (SWD) MCGM | [signature] | 9769085856. |
| १७ | S.K. Railkar | Dy ChE (SWD) P) cell | [signature] | 9892417020 |
| १८ | स्वाधिन क्षत्रिय | M.C. महानगरपालिका आयुक्त | Kshatriya | 9870333182 |
| १९ | डि. यु. गणामिरे | Supt. Engr. | [signature] | 9930627282 |
| २० | प्र. श. कानिटकर | मुख्य, जलनिःसारण | प्र.श. कानिटकर | 9371020268 |
| २१ | D. Sampathkumar | Sr. Plnr, PD, MMRDA | Sampathkumar | 26594062 |
| २२ | दिलीप कवठकर | सह प्रकल्प संचालक | [signature] | २६४९९२८६ |
| २३ | श्री. र. नंदर्गीकर | मुख्य अभियंता MMRDA | SRN | 26541234 |

दि.२५ मे,२०१० रोजी दु.०४.०० वा. समिती कक्ष,मंत्रालय येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस उपस्थित असलेल्यांची यादी

**बैठकीचा विषय :-** मिठी नदी विकास प्राधिकरण सहावी बैठक

| अ.क्र. | नांव | पदनाम | स्वाक्षरी | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | SURESH SHETTY | Minister | [signature] | |
| ३ | Ramesh Bhalis | MIAL (Airport) | [signature] | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |
| ११ | | | | |
| १२ | | | | |
| १३ | | | | |
| १४ | | | | |
| १५ | | | | |
| १६ | | | | |
| १७ | | | | |
| १८ | | | | |
| १९ | | | | |
| २० | | | | |
| २१ | | | | |
| २२ | | | | |
| २३ | | | | |

# मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण

## ६ वी बैठक, २५ मे, २०१०

विवरण पत्र - अ

| अ.क्र. | बैठकीमधील मुद्दे | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|
| १. | मिठी नदीचे रुंदीकरण | मिठी नदीच्या रुंदीकरणाचा भाग हा बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या कार्यक्षेत्रात येतो. १००वर्षे परतावा कालावधी विचारात घेऊन मिठी नदीच्या संपूर्ण लांबीकरीता आवश्यक असलेल्या रुंदीची शिफारस सीडब्ल्यूपीआरएस या संस्थेने केली आहे. तसेच सत्यशोधक समितीने मिठी नदीच्या एकूण लांबीपैकी फक्त ज्या क्षेत्रात भरतीचा परिणाम आढळतो त्या क्षेत्राकरीता १०० वर्षे परतावा कालावधी व इतर क्षेत्राकरीता १० वर्ष परतावा कालावधी निश्चित करुन आवश्यक असलेली मिठी नदीच्या रुंदीची शिफारस केली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर शिफारस केलेल्या रुंदीमध्ये कामाच्या सुसाध्यतेकरीता काही प्रमाणात बदल करण्याची विनंती केली आहे. सदर विषयावर मागील बैठकीत चर्चा करण्यात आली होती. त्याप्रमाणे मुंमप्रविप्रा. आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांना स्थानिक आमदार व खासदार यांच्याशी सल्लामसलत करणे आणि त्यानुसार मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे सूचित करण्यात आले होते. त्यानुसार नदीचे सुसाध्य संरेखन व रुंदी दर्शविणारा नकाशा मान्यतेसाठी सादर. |
| २ | वाकोला नाल्याचे रुंदीकरण | मिठी नदीच्या रुंदीकरणाचा भाग हा बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या कार्यक्षेत्रात येतो. १००वर्षे परतावा कालावधी विचारात घेऊन मिठी नदीच्या संपूर्ण लांबीकरीता आवश्यक असलेल्या रुंदीची शिफारस सीडब्ल्यूपीआरएस या संस्थेने केली आहे. तसेच सत्यशोधक समितीने मिठी नदीच्या एकूण लांबीपैकी फक्त ज्या क्षेत्रात भरतीचा परिणाम आढळतो त्या क्षेत्राकरीता १०० वर्षे परतावा कालावधी व इतर क्षेत्राकरीता १० वर्ष परतावा कालावधी निश्चित करुन आवश्यक असलेली मिठी नदीच्या रुंदीची शिफारस केली आहे. त्याप्रमाणे मुंमप्रविप्रा व बृहन्मुंबई महानगरपालिकेने चितळे समितीच्या शिफारशी अंगीकारल्या आहेत. आजच्या बैठकीत सदर प्रस्तावास औपचारीक मान्यता देण्याची विनंती आहे. |
| ३. | सेवा रस्त्याचे तरतूद | जागेच्या उपलब्धतेनुसार ६ मी. ते १२ मीटरचा सेवा रस्ता द्यावा तसेच नदीला लागून समांतर रस्ता अस्तित्वात अथवा प्रस्तावित असल्यास त्याच रस्त्यास सेवारस्ता म्हणून अभिप्रेत करण्यात यावे. |
| ४. | माहिम कॉजवे येथे स्लुईज गेट बांधणे. | मागील बैठकीत चर्चा केल्याप्रमाणे महापूरामध्ये स्लुईज गेटची कार्यक्षमता नसल्यामुळे सीडब्ल्यूपीआरएसने मत प्रदर्शित केल्याप्रमाणे आणि त्यानंतर विविध बैठकीत झालेल्या चर्चेप्रमाणे सदर प्रस्ताव वगळण्याचे प्रस्तावित करण्यात आले. |
| ५. | मिठी नदीच्या कामांची अंमलबजावणी | मुंमप्रविप्रा व बृहन्मुंबई महानगरपालिका सुधारीत अंदाज पत्रकानुसार रु. १६५७ कोटी खर्चाच्या टप्पा-२ मधील कामांची सद्यस्थितीत अंमलबजावणी करीत आहे. त्यापैकी आतापर्यंत रु. ६०० कोटी खर्च करण्यात आलेला आहे. प्रगती पथावरील कामांची सद्यस्थिती बैठकीमध्ये सादर करण्यात येईल. |
| ६. | मिठी नदी विकासाच्या बाबींचे मुंबई विकास योजनेमध्ये अंतर्भाव करणे. | मिठी व वाकोला नदीचे संरेखन आणि रुंदी सध्या सुरु असलेल्या मुंबई विकास आराखडयाच्या सुधारणेमध्ये अंतर्भाव करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच सेवा रस्त्याचाही अंतर्भात करण्यात येईल. |

## मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण

### ६ वी बैठक, २५ मे, २०१०

विवरण पत्र - ब

| अ.क्र. | बैठकीमधील मुद्दे | शासनाच्या निर्णयार्थ प्रस्ताव |
|---|---|---|
| | मिठी नदीचे रुंदीकरण | सत्यशोधक समितीच्या शिफारशीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात मिठी नदीचे रुंदीकरण करणे.<br>मुंमप्रविप्रा क्षेत्रात :<br>• माहिम कॉजवे ते मिनी कॉन्फ्लेन्स – सध्या अस्तित्वात असलेली रुंदी अबाधित ठेवणे.<br>• मिनी कॉन्फ्लेन्स ते नवीन मिठी पूल – नदीची रुंदी सरासरी १६० मी. असणे.<br>• नवीन मिठी पूल ते सीएसटी पूल – नदीची रुंदी ७० ते १०० मीटर असणे. |
| २ | वाकोला नाल्याचे रुंदीकरण | बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंमप्रविप्रा. क्षेत्रात असलेल्या नदीचे रुंदीकरण सत्यशोधक समितीच्या शिफारशीप्रमाणे करणे आवश्यक. |
| ३. | सेवा रस्त्याचे तरतूद | खाजगी व सार्वजनिक जागेमध्ये उपलब्धतेनुसार ६ ते १२ मीटर रुंदीचा सेवारस्ता करणे आवश्यक. ज्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या पक्क्या इमारती बाधित होत आहेत त्या ठिकाणी पुनर्वसन प्रकल्प प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सदर सेवारस्त्यांचा अंतर्भाव करण्यात यावा. जेथे शक्य नाही तेथे काही अंतरावर प्रवेश देण्यात यावे. नदीच्या समांतर अथवा जवळपास रस्ता उपलब्ध असल्यास सदर रस्त्याला सेवारस्ता म्हणून समजण्यात यावे. |
| ४. | माहिम कॉजवे येथे स्लुईज गेट बांधणे. | स्लुईज गेट बांधण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका छोटया पूराकरीता सदर गेट लावण्याबद्दल पडताळणी करुन स्वतंत्रपणे विचार करु शकते. |
| ५. | मिठी नदीच्या कामांची अंमलबजावणी | अतिरिक्त केंद्र सहाय्यक (एसीए) म्हणून केंद्र शासनाकडून वित्तीय सहाय्य उपलब्ध होण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्ताव डिसेंबर, २००९ मध्ये सादर करण्यात आला आहे. एमआरडीपीए सदर प्रस्तावाचा पाठपुरवठा करेल. |
| ६. | मिठी नदी विकासाच्या बाबींचे मुंबई विकास योजनेमध्ये अंतर्भाव करणे. | प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेस योग्य त्या सूचना एमआरडीपीएने द्याव्यात. |

# SUMMARY OF MOM OF 1-6 MTGS OF MRDPA

AS ON 10/5/2012

| SERIAL NO | 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
|---|---|---|---|---|---|---|
| MTG DATE | 1 SEPT 2005 | 1 OCT 2005 | 26 OCT 2006 | 20 APRIL 2007 | 5 MAY 2008 | 25 MAY 2010 |
| CHAIRMAN | SHRI VILASRAO DESHMUKH , HON CM AND CHAIRMAN MRDPA | SHRI VILASRAO DESHMUKH , HON CM AND CHAIRMAN MRDPA | SHRI VILASRAO DESHMUKH , HON CM AND CHAIRMAN MRDPA | SHRI VILASRAO DESHMUKH , HON CM AND CHAIRMAN MRDPA | SHRI VILASRAO DESHMUKH , HON CM AND CHAIRMAN MRDPA | SHRI ASHOK CHAVAN , HON CM AND CHAIRMAN MRDPA |
| MRDPA FILE NO | 52 | 147 | 49 | 50 | 148 | |
| ACTION POINTS | | | | | | |
| 1. | | | | | | |
| 2. | | | | | | |
| 3. | | | | | | |
| 4. | | | | | | |
| 5. | | | | | | |
| 6. | | | | | | |
| 7. | | | | | | |
| 8. | | | | | | |
| 9. | | | | | | |
| 10. | | | | | | |
| 11. | | | | | | |
| 12. | | | | | | |
| 13. | | | | | | |
| 14. | | | | | | |
| 15. | | | | | | |

# Action Taken Report on MRDPA Meetings: 1-6

| Mtg. No | Date | Issue discussed in Authority Meeting Chairman- Hon. Chief Minister | Status as on October 2012 |
|---|---|---|---|
| 1 | 01-Sep-05 | Undertake Hydrologival Study of of Mithi, Dahisar, Oshiwara, Poisar, ulhas, waldhuni | Study Completed by , IIT Bombay, CWPRS, Pune WAPCOS Delhi, MERI, Nashik |
| 2 | 01-Oct-05 | Remove illegal structures | R&R done by MMRDA |
| | | Prepare Hydraulic Model | CWPRS – under progress |
| | | Remove unauthorized industrial units. | MPCB- issued closure directions- 470 units |
| 3 | 26-Oct-06 | Consider FFC and CWPRS for width finalization on practical basis in view of legal and religious structures. | Finalized in 6$^{th}$ Meeting on 25.5.2010 |
| 4 | 20-Apr-07 | Widening of Mithi river as per Published DP | Finalized in 6$^{th}$ Meeting on 25.5.2010 |
| | | Widening of bridges on Mithi | Improvements of 15 bridges undertaken, 5 complete by MMRDA & MCGM and 5 balance. |
| 5 | 05-May-08 | Study of marine platform to reduce R&R | Proposal dropped – Financially non viable , widening retaining wall considered |
| | | Meeting with concerned MLA to be held for width finalization | Meeting held on 13.5.2008- width finalized in 6$^{th}$ Meeting on 25.5.2010 |
| 6 | 25-May-10 | Follow up with GoI for financial assistance | Pending with GoI |
| | | Finalize width, of Mithi and Vakolla considering FFC, CWPRS, IIT (B) and practical consideration | Width finalized plan approved. |
| | | Sluice gate | Proposal dropped as technically non feasible-CWPRS by EC on 3.1.2010. |
| | | Protection wall | Retaining wall work in progress |
| | | Service road along the bank of river | To be incorporated in revised DP of MCGM |
| | | MIAL widening work within airport | Widened as per Prof. Kapil Gupta – IIT Bombay (29.9.2010 report)- existing 27 m old culvert + proposed 2 cell Box culvert each 12 m wide and 4.1 m deep. Work completed on 31.05.2012 |

# Action Taken Report on MRDPA Meetings: 1-6

| Mtg. No | Date | Issue discussed in Authority Meeting Chairman- Hon. Chief Minister | Status as on February 2013 |
|---|---|---|---|
| 1 | 01-Sep-05 | Undertake Hydrologival Study of of Mithi, Dahisar, Oshiwara, Poisar, ulhas, waldhuni | Study Completed by , IIT Bombay, CWPRS, Pune WAPCOS Delhi, MERI, Nashik |
| 2 | 01-Oct-05 | Remove illegal structures | R&R done by MMRDA |
| | | Prepare Hydraulic Model | CWPRS – under progress |
| | | Remove unauthorized industrial units. | MPCB- Presentation on current Status - Today |
| 3 | 26-Oct-06 | Consider FFC and CWPRS for width finalization on practical basis in view of legal and religious structures. | Finalized in 6th Meeting on 25.5.2010 |
| 4 | 20-Apr-07 | Widening of Mithi river as per Published DP | Finalized in 6th Meeting on 25.5.2010 |
| | | Widening of bridges on Mithi | Improvements of 15 bridges undertaken, 5 complete by MMRDA & MCGM and 5 balance. for MoEF Permission |
| 5 | 05-May-08 | Study of marine platform to reduce R&R | Proposal dropped – Financially non viable , widening retaining wall considered |
| | | Meeting with concerned MLA to be held for width finalization | Meeting held on 13.5.2008- width finalized in 6th Meeting on 25.5.2010 |
| 6 | 25-May-10 | Follow up with GoI for financial assistance | Pending with GoI |
| | | Finalize width, of Mithi and Vakolla considering FFC, CWPRS, IIT (B) and practical consideration | Width finalized plan approved. |
| | | Sluice gate | Proposal dropped as technically non feasible-CWPRS by EC on 3.1.2010. |
| | | Protection wall | Retaining wall work in progress |
| | | Service road along the bank of river | To be incorporated in revised DP of MCGM |
| | | MIAL widening work within airport | Widened as per Prof. Kapil Gupta – IIT Bombay (29.9.2010 report)- existing 27 m old culvert + proposed 2 cell Box culvert each 12 m wide and 4.1 m deep. Work completed on 31.05.2012 |